दिनांक : २७.०८.२०१८

निविदा पूर्व बैठकीचे (Pre-bid ) इतिवृत्त

यशदातील BID FOR THE RATE CONTRACT OF SUPPLY OF STATIONERY ITEMS THROUGHOUT THE YEAR 2018-2020 या कामासाठी दिनांक २१.०८.२०१८ ते ०४.०९.२०१८ या कालावधीमध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने निविदादारांच्या शंका समाधानासाठी दिनांक २७.०८.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा पूर्व बैठक (Pre-bid ) आयोजित करण्यात आली होती.

०२ सदर बैठकीसाठी खाली नमुद करण्यात आल्यानुसार यशदाचे प्रतिनिधी तसेच निविदादार/प्रतिनिधी हजर होते.

| अ क्र | बैठकीसाठी उपस्थित असलेले यशदाचे प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री सतिश तडकसे, वित्तिय सल्लागार |
| ०२ | श्री देवराम शेळके, प्रापण प्रमुख |
| ०३ | श्री. प्रसाद आचार्य, उपनिबंधक |
| ०४ | श्री विकास कटकधोंड, सहायक , प्रापण |
| ०५ | श्री मुकुंद वीर, तांत्रिक सहायक, सीआयटी |

| अ क्र | निविदादार/प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री संजय बालकृष्ण खांकरी, एस कुमार एजन्सी, पुणे |
| ०२ | श्री महेश शरद शेंडगे, मेघा ट्रेडर्स, पुणे |
| ०३ | साई श्रध्दा, सोलापूर |

०३ निविदा पूर्व बैठकीसाठी (Pre-bid Meeting) उपस्थित असलेले निविदादार / प्रतिनिधी यांना प्रमुख प्रापण यांचेकडून प्रथम ई-निविदेबाबत अवगत करून देण्यात आले व याबाबत काही शंका असल्यास विचारण्यात यावेत असे त्यांना सांगण्यात आले. यावर निविदादारांकडून खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित करण्यात आले असून तसे लेखी निवेदन त्यांच्याकडून सादर करण्यात आले आहे. सदर मुद्दांबाबत यशदाकडुन करण्यात आलेला खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | उपस्थित मुद्दे | यशदाकडुन करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| ०१ | ई-निविदामध्ये मागविण्यात आलेले काही नमुने Manufacturing Item असून ते तयार करण्यास वेळ लागणार असल्याने विहीत वेळेत ई-निविदा भरण्यापुर्वी यशदास सादर करणे शक्य होणार नाही. निविदा अंतिम झाल्यानंतर यशदाकडून नमुन्यांची मागणी करण्यात यावी. | ई-निविदा अंतिम झाल्यानंतर नमुने मागविण्यात येतील ती यशदाकडून अंतिम केल्यानंतर त्या अनुसार पुरवठादारांकडून पुरवठा करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणतेही नमुने सादर करण्याची आवश्यकता नाही, त्याप्रमाणे ई-निविदेतील नमुन्याशी संबंधित अटींमध्ये बदल झालेला आहे असे समजण्यात यावे. |
| ०२ | ई-निविदामध्ये नमुद केलेल्या नमुन्याची पाहणी करण्यात आली तथापि योग्य किंमत काढण्यासाठी सदरचे नमुने उपलब्ध करून देण्यात यावे अशी निविदादारांकडून मागणी करण्यात आली. | निविदादारांना त्यांच्या लेखी मागणीनुसार नमुने उपलब्ध करून देण्यात येतील, त्यासाठी नमुन्यापोटी रूपये ५००/- (रूपये पाचशे फक्त) इतकी अनामत रक्कम प्रापण कक्षाकडे जमा करण्यात यावी, ई-निविदा भरल्यानंतर सदरचे नमुने सात दिवसांच्या आत यशदाकडे परत करणे आवश्यक राहील. सदरचे नमुने प्रापण कक्षाकडे परत केल्यानंतर ठेवण्यात आलेली अनामत रक्कम संबंधितास परत करण्यात येईल. विहित मुदतीत नमुने परत न केल्यास सदर रक्कम यशदामार्फत जप्त करण्यात येईल. |

०४ वरील प्रमाणे निविदादारांच्या शंकाचे निरसन करण्यात आले व उपस्थित निविदादारांचे आभार मानण्यात येवून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

(तांत्रिक सहायक, सीआयटी) (सहायक) (प्रमुख प्रापण) (उपनिबंधक) (वित्तीय सल्लागार)